"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
WEB SITE : http://www.nkgsbsangh.org
E-MAIL : nkgsbs@gmail.com
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। मरणं प्रकृतिः शरीराणाम् ।।

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५

क्रमांक ४ वर्ष : ४३ जानेवारी – मार्च २०२२

BOOK PACKET
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

TO,

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.संघ आणि
## दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी
## वार्षिक स्नेहसंमेलन - २०२१ - २०२२

### निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

प्रमुख पाहुण्या : विदुषी श्रीमती नीलिमा शशिकान्त नाडकर्णी
स्थळ : प्राचार्य बी. एन्. वैद्य सभागृह हिंदू कॉलनी, दादर
दिनांक : शनिवार २६ फेब्रुवारी २०२२, सायं. ४.१५ वाजता

### कार्यक्रम

- स्वागत गीत
- संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
- प्रमुख पाहुण्यांचे मनोगत
- मध्यंतर
- विवाहाची सुवर्णजयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार २०२०, २०२१
- एज्यु. सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना श्रीमती नाडकर्णी यांच्या हस्ते बक्षिसे.

**स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

टीप : उपस्थितांनी कोविड नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. करोना साथीमुळे उद्‌भवलेल्या अनिश्चितीतेच्या पार्श्वभूमीवर संमेलन स्थगित करण्याचा प्रसंग आला तर खबरदारी म्हणून संमेलनाला उपस्थित राहणाऱ्या इच्छुकांनी संमेलनाच्या ३-४ दिवस अगोदर संघ कार्यालयात ३ ते ६ दरम्यान संपर्क साधावा.

**मारुती वि. दळवी**
कार्याध्यक्ष-संघ

**देवदास अ. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष-एज्युकेशन सोसायटी

## संपादकीय

### आगामी वार्षिक ज्ञातिस्नेहसंमेलनाच्या प्रमुख पाहुण्या विदुषी श्रीमती नीलिमा नाडकर्णी

माहीम येथील श्रीमती नीलिमा शशिकान्त नाडकर्णी या त्यांच्या मुखपत्रिकेंतील विविध विषयांवरील लेखांमुळे सर्वांना परिचित झालेल्या आहेत. बरोबर तीस वर्षापूर्वी जानेवारी १९९२ मध्ये स्नेह संमेलनाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून आणखी एक विदुषी डॉ. ऊर्मिला मोहन वर्टी उपस्थित होत्या. आता तीन दशकानंतर आणखी एका विदुषीचा आगामी स्नेह संमेलनांत प्रमुख पाहुण्या म्हणून सत्कार करण्याचा सुयोग आला आहे.

श्रीमती नाडकर्णी यांचे कॉलेज शिक्षण फर्गुसन कॉलेजमध्ये झाले. बी.ए. प्रथम वर्ग. तेव्हांपासूनच त्यांना लिखाणाची गोडी होती. 'दिसामांजी कांहीतरी लिहावे' ही उक्ती त्यांनी प्रत्यक्षांत आचरणात आणली. त्यांच्या कुटुंबवत्सल स्वभावामुळे घरात नेहमी नातेवाईकांचा व पाहुण्यांचा राबता असतो. त्यात मुलांचे वर्ग. तरी त्या उत्साहाने, नेमाने व चिकाटीने लेखन करीत व करतात. शाळेच्या मासिकांकरतां अनेक निबंध, कथा व लघुलेख लिहिले. विविध निबंधस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा यांत उमेदीने भाग घेऊन त्यांनी पारितोषिके मिळवलेली आहेत.

विवाह होऊन मुंबईत स्थायिक झाल्यावर त्यांनी विविध मासिकांतून आणि वृत्तपत्रांतून लिखाण करण्यास सुरवात केली. माहेर, स्त्री, रोहिणी, कथाश्री, अमृत अशा मासिकांतून त्यांच्या कथा व ललितलेख प्रसिध्द झालेल्या आहेत. मुंबई आकाशवाणीकरता तर त्यांनी विपुल लेखन केलेले आहे. कोंकणी, मराठी व हिन्दी या तीनही भाषांवर त्यांचे प्रभुत्व असल्याने त्यांनी आकाशवाणीवर अनेक कार्यक्रम सादर केलेले आहेत.

श्रीमती नाडकर्णी यांचा पिंड आहे कथालेखनाचा : वर नमूद केलेल्या अनेक मासिकांत त्यांच्या कथा प्रसिध्द झाल्या आहेत. त्यातील निवडक कथांचा संग्रह 'तरंग' या नावाने जानेवारी २००६, मध्ये बालमोहनचे श्री बापूसाहेब रेगे यांच्या हस्ते प्रकाशित झाला. त्यातील दर्जेदार लेखनाची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या पुस्तकाला अनुदान दिले आहे. २००७ साली या संग्रहास महाराष्ट्र शासनाचा यशवंतराव चव्हाण हा पुरस्कार मिळाला. मुखपत्रिकेत त्यांनी लिहिलेले विद्युलेखा अकलूजकर यांच्या पुस्तकाचे परीक्षण वाचून सुप्रसिध्द समीक्षक श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी 'अभ्यासपूर्ण लेख' अशी प्रतिक्रिया देऊन नीलिमाताईंचे कौतुक केले.

त्यांच्या लेखनाची आणखी एक खासियत म्हणजे 'मागणी तसा पुरवठा' करण्यातही त्यांचे कौशल्य आहे. त्या राहतात त्या 'शांतीनगर' येथील गणेशोत्सवाच्या कार्यक्रमाचे निवेदन असो, एखाद्या वक्तृत्व स्पर्धेमधील भाषण असो किंवा नातवाकरिता एकांकिका असो ते उत्कृष्ठच असणार म्हणून संबंधित पदाधिकारी निश्चिंत असतात.

नीलिमाताईंचे लेखनकलेवरचे प्रेम असेच टिकून राहो व त्यांच्या हातून श्रेष्ठ दर्जाची साहित्य निर्मिती होवो हीच श्रीमंगेशचरणी प्रार्थना. देव बरें करूं.

१ जानेवारी २०२२



## ठाणे मंच रौप्यमहोत्सवी सांगता सोहळा

### निमंत्रण पत्रिका

करोना महामारीमुळे रद्द झालेला सोहळा नववर्षात संपन्न होत आहे.

दिनांक : **रविवार २० मार्च २०२२ वेळ सकाळी १० ते ५.३०**

स्थळ : **प्रा. बी. एन्. वैद्य सभागृह,** राजा शिवाजी विद्यालय, दादर पूर्व.

कार्यक्रमाचे अध्यक्ष : आपल्या बँकेचे उपाध्यक्ष **श्री. सुनील गायतोंडे**

सन्माननीय पाहुणे : प्रथितयश उद्योजक **श्री. सतीश वाघ**

### कार्यक्रम

- नाव नोंदणी : अल्पोपाहार
- गणेश वंदना
- अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत.
- ठाणे मंचाने संपादित केलेल्या 'स्मरणिकेचे' प्रकाशन,
- ठाणे मंचाच्या कार्यास सहकार्य केलेल्या व्यक्तींचा सत्कार.
- अध्यक्ष व सन्माननीय पाहुण्यांचे मनोगत.

### मध्यंतर-भोजन

***विविध करमणुकीचे कार्यक्रम (तपशील पृ. १३ वर)***

आपण आपल्या आप्तेष्टांसह या कार्यक्रमास सहभागी व्हावे ही नम्र विनंती.

**– ठाणे मंच–कार्यकारिणी**

**ता. क. :** वरील कार्यक्रमासाठी ठाणे–मुलुंड मार्गे (१) आणि जोगेश्वरी / अंधेरी / विले पारले मार्गे (१) बस ठीक सकाळी ८.३० वाजता सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. **इच्छुकांनी आपली नांवे/मोबाइल क्रमांक कळवावी.**

| **सुरेश पालेकर** | **अरुण वाघ** | **राजेश दिवेकर** |
|---|---|---|
| ८९२८८५०१९३ | ९८२०३७७१०२ | ९६१९३६२४६० |
| ९९६९४५५३७० (व्हॉटस ॲप) | | |

टीप : उपस्थितांनी कोविड नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. करोना साथीमुळे उद्‌भवलेल्या अनिश्चितीतेच्या पार्श्वभूमीवर संमेलन स्थगित करण्याचा प्रसंग आला तर खबरदारी म्हणून संमेलनाला उपस्थित राहणाऱ्या इच्छुकांनी कार्यक्रमाच्या ३–४ दिवस अगोदर वरील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

# प्रकाश झोत

## हिन्दू हायस्कूलचा शतकोत्तर रौप्य महोत्सव

कारवार येथील हिन्दू हायस्कूल म्हणजे त्या शहराचे एक भूषण. ती केवळ चार भिंतीच्या आत भरणाऱ्या वर्गामध्ये शिकवणारी सर्वसामान्य शाळा नसून स्थानिक संस्कृतीचे एक केन्द्रही आहे. कारवारच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक चढणघडणींत या शाळेतील विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा व व्यवस्थापकांचा लक्षणीय वाटा आहे. सध्या शालांत परीक्षेच्या अंतर्गत गुणवत्ता यादी देण्याची पध्दत नाही. पण जेव्हां ती प्रचलीत होती तेव्हां गुणवत्ता यादीत बहुतेक वेळा या शाळेचे विद्यार्थी असत. त्याचा कळस म्हणजे १९३८ साली कारवार ते कराची पर्यंत पसरलेल्या तेव्हांच्या संपूर्ण मुंबई इलाख्यातून शाळेचे एक अचाट बुध्दीमत्तेचे विद्यार्थी श्री. पी. डी. कसबेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला होता. ते सुध्दां कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास करून. शाळेचे दोन विद्यार्थी भारताच्या दोन विरुध्द दिशेच्या राज्यात चीफ सेक्रेटरीच्या अत्युच्च पदावर पोचले होते. एक म्हणजे पश्चिमेचे राज्य महाराष्ट्राचे चीफ सेक्रेटरी म्हणून स्वत: श्री. कसबेकर व दुसरे म्हणजे पूर्वेचे एक राज्य आसामचे चीफ सेक्रेटरी म्हणून श्री. शशिकांत डी. फेणे. शाळेचे असंख्य विद्यार्थी देश विदेशांत नाव कमावून आहेत. पण त्या सर्वांना आपल्या शाळेविषयी आत्मीयता आहे व तेथील ऋषीतुल्य शिक्षकांविषयी अद्याप ते आदर बाळगून आहेत.

अशा या शाळेची स्थापना १२५ वर्षापूर्वी २ जानेवारी १८९७ साली झाली. आद्य संस्थापक होते कै. वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी (पु. लं. चे आजोबा) व कै. हरी बाबू कामत.

कालांतराने ही खासगी शाळा नुनामास्तर व धीमण्णा या बंधुद्वयांनी चालवायला घेतली. नंतर १९४४ साली कारवार एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली व या शाळेचे व्यवस्थापन या सोसायटीकडे आले व खासगी शाळेचे रूपांतर सार्वजनिक संस्थेमध्ये झाले. या सोसायटीचे पहिले कार्याध्यक्ष होते कारवारचे एक प्रतिष्ठित नागरिक रा. ब. गणपतराव तेलंग. त्यांनी १९४४ ते ५९ या कालावधीत संस्थेची धुरा वाहिली. त्यांच्या पश्चात श्री. शांताराम व्ही कामत (कामत मास्तर) (१९५९ ते ६४), श्री. आनंद नाडकर्णी (१९६४ ते ७४), श्री. शंकर मुझुमदार (१९७४ ते ८३), श्री. श्रीकृष्ण सबनीस (सबनीस मास्तर) (१९८३–८४) यांनी कार्याध्यक्ष म्हणून काम पाहिले. १९८४ पासून कारवारचे एक प्रतिष्ठित वकील श्री. श्रीधर कामत कार्याध्यक्ष म्हणून शाळेचे व्यवस्थापन यशस्वीपणे चालवीत आहेत.

शाळेचे आणखी एक वाखाणण्यासारखे वैशिष्ट्य म्हणजे शिक्षक भरतीमध्यें व विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेंत कुठलाही गैरप्रकार वा अनियमितपणा नसतो. शाळेची उत्तरोत्तर प्रगती होवो ही या प्रसंगी सदिच्छा.



# मुखपत्रिकेचे संपादक श्री. द. ना. नाडकर्णी

## यांचा सारस्वत प्रकाशनतर्फे सत्कार.

सारस्वत प्रकाशन मुंबई यांनी आयोजीत केलेला २१ वा 'सारस्वत चैतन्य गौरव' सोहळा तेंडुलकर मंगल कार्यालय, माहीम येथे शनिवार दि. १८ डिसेम्बर २०२१ रोजी थाटामाटात साजरा झाला.

शिक्षण, साहित्य, पत्रकारिता, वैद्यकीय, कला–क्रीडा, सामाजिक अशा विविध क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटविलेल्या सारस्वत ज्ञातिजनांचा सारस्वत प्रकाशन माध्यमातून 'सारस्वत चैतन्य गौरव पुरस्कर' देऊन गौरव केला जातो. ह्या वर्षी आपल्या मुखपत्रिकेचे संपादक श्री. द. ना. नाडकर्णी यांना सामाजिक कार्याबद्दल पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जागतिक कीर्तीचे चित्रकार श्री. वासुदेव कामत आणि विशेष अतिथी म्हणून सारस्वत बँकेचे अध्यक्ष श्री. गौतम ठाकुर उपस्थित होते. सत्कारास उत्तर देताना आपल्या छोटा कारवारी जी.एस.बी. समाजाचे कारवार मधून मुंबईत झालेले स्थलांतर, Education Society आणि संघाची झालेली स्थापना व कार्याची त्यांनी थोडक्यात माहिती दिली. तसेच ठाणे मंचाने राबवलेल्या 'वधूवर विवाह मंडळाचे' कार्य थोडक्यात सांगितले. सारस्वत प्रकाशन यांनी एज्युकेशन सोसायटी आणि संघ यांच्या कार्याचाही गौरव करावा अशी त्यांनी इच्छा प्रकट केली.

श्री. नाडकर्णी सातत्याने ५० वर्षे करत असलेल्या सेवाकार्याची उपस्थितांनी टाळ्या वाजवून प्रशंसा केली.

**– सुरेश पालेकर,** फोन : ८९२८८५०१९३

## कारवार नगरपालिका 'स्वच्छ सर्वेक्षण अभियान' या योजने अंतर्गत कर्नाटक राज्यात सर्वप्रथम

कर्नाटक राज्याच्या 'स्वच्छ सर्वेक्षण अभियान' या योजने अंतर्गत 'नम्म कारवार' म्हणजे कारवार नगरपालिकेला राज्यात प्रथम क्रमांक मिळाला. दक्षिणेतील सहा राज्ये व केंद्र सरकारच्या अखत्यारीतील एक राज्य अशा विशाल विभागात कारवारला सहावे स्थान मिळाले. विशेष म्हणजे कारवार नगरपालिकेचे विद्यमान अध्यक्ष डॉ. नितीन पिकळे हे आहेत.

## मी आणि माझा लेखन प्रवास

जीवनात अनेक गोष्टी अचानक घडतात. त्यालाच आपण योगायोग म्हणतो. काही माणसे जीवनात दीपस्तंभासारखी आपले जीवन उजळून टाकतात. या 'ऋणानुबंधा'च्या गाठी असतात असे मला वाटते.

ऑक्टोबर २१ च्या मुखपत्रिकेत 'सदाशिवगडा' वर लिहिलेला लेख वाचकांना खूप आवडला. अनेकांचे फोन आले. अनेक वाचकांनी कौतुकाने विचारले, ''तुम्ही छान लिहिता. तुमच्या लिखाणातून पुणेरी शुध्द भाषेची झलक जाणवते.'' त्यांच्या प्रश्नांनी मनात विचारांचे काहूर उठले. कोरा कागद अन् पेन घेतलं. कुठून सुरवात करायची या विचारांनीच मला घेरलं. एकदा लिहायचंय असं ठरलं की मी स्वस्थ बसत नाही.

माझं माहेर अन् सासर कर्नाटक राज्यात आहे. मी गौड सारस्वत ब्राह्मण. म्हणजे G. S. B. हा त्याचा शॉर्टकट म्हणा. माझी बोली भाषा 'कोंकणी' अन् मातृभाषा 'मराठी' होय या दोघी माझ्या बहिणी आहेत याचा मला खूपखूप अभिमान आहे. माझं माध्यमिक शिक्षण गावी झालं अन् कॉलेज-शिक्षण पुणे विद्यापीठातून झालं.

विवाहानंतर मी लोणावळेकरीण झाले, आमच्या 'लादीवाला बिल्डींग' मध्ये नाविक दलाचे -आय्. एन्. शिवाजी इथे सर्व्हिस करणारे रहिवाशी परभाषिक होते. ते इंग्रजीतूनच संवाद साधायचे मात्र गल्लीतील रहिवाशी जरी वेगवेगळ्या धर्माचे असले तरी प्रामुख्याने मराठीतूनच बोलायचे. केवळ 'इंग्रजी' छान बोलता यावे म्हणून 'आक्झिलीयम' कॉन्व्हेंटमध्ये चार वर्षे नोकरी केली. शाळेच्या जवळच राहणारे शेवडेकाका अन् काकीशी माझा परिचय झाला. त्यांनी मला सल्ला दिला की या नन्स् (सिस्टर्स) मध्ये तू एकटी महाराष्ट्रीयन दिसते. आपल्या लोकांच्या शाळेत नोकरी का करत नाहीस ? मला ते पटले अन् सुदैवाने सुप्रसिध्द व्ही. पी. एस्. शाळेत अध्यापनाचे काम मिळाले. अन् माझ्या भावी जीवनाचे सुंदर पर्व सुरू झाले.

बी. ए. ला माझे इंग्रजी समाजशास्त्र हे विषय असले तरी मला दोन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यांना मराठी अध्यापनाचे काम दिले गेले. 'हिंदी' विषयाच्या 'टॉप' परीक्षा दिल्यामुळे 'हिंदी' विषयही दिला गेला. माझे सर्व सहकारी 'पुणेरी' असल्यामुळे त्यांच्या बोलण्यातून शुध्द मराठी जाणवत होती. माझ्या भाषेचा 'लहजा' कोंकणी अन् इंग्रजीकडे झुकणारा होता. तेव्हा माझ्या काही मिश्किल मैत्रिणी विचारीत होत्या, 'काय ग,तू वेंगुर्ल्याची आहेस का? तू मराठी व्याकरणाचा फज्जा पाडतेस.' मला थोडं वाईट वाटायचं. मी मनात दृढ निश्चय केला की मला माझी मराठी सुधारायला हवी.

एम्.ए.ला मुद्दाम 'मराठी' विषय घेतला. पहिल्या वर्षी संतवाङ्मयाबरोबर 'कुसुमाग्रजांची' १७ पुस्तके तसेच कविवर्य बा. भ. बोरकरांचा 'चांदणवेल' कवितासंग्रह होता अन् दुसऱ्यावर्षी संपूर्ण 'ज्ञानेश्वरी'चा अभ्यास केला. मराठी भाषेचे मर्म, व्याकरण यांचा भरपूर अभ्यास झाला. सौ. सुधाताई देसाईमुळे कवि बा.भ. बोरकरांनी मला रमलाची रात्र, गेयशा, चांदणवेल अश्या



अनेक कवितांचा 'गूढार्थ' समजून सांगितला. तिच्यामुळेच प्रसिध्द टी.व्ही. स्टार 'सुहासिनी मुळगावकर' यांचे पिताश्री देशपांडे काकांशी परिचय झाला. ते 'गीते'चे प्रगाढ अभ्यासक होते. त्यांच्या कृपाप्रसादाने माझे ज्ञानच नव्हे मराठी भाषाही खूप सुधारली. हा सगळा योगायोग !

आमच्या शाळेत 'आंतरशालेय नाट्यस्पर्धा' होत. परंतु त्याकाळात मला वाटते 'बालवाङ्मय' कमी हाते. मी स्वतः छोटी छोटी नाटुकली लिहीली अन् हिरीरीने विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेण्यास प्रवृत्त केले. आमच्या शाळेला, मलाही पारितोषिके मिळाली. मला वाटते इथूनच पुढे 'लेखनाचा प्रवास' सुरू झाला. लेखिका म्हणून लोक ओळखू लागले. मैत्रिणी म्हणाल्या, 'तुझं कौतुक वाटते. तू आमच्याही पुढे गेलीस.'

अचानक 'आकाशवाणी' पुणे केंद्रावर माझा कथाकथनाचा कार्यक्रम सुरू झाला. माझ्या अनेक कथा, कविता, लेख अनेक दिवाळी अंकातून प्रकाशित झाल्या. सारस्वत चैतन्य, वसंत, गृहलक्ष्मी, लोकसत्ता, सखी, वाङ्मय शोभा आणि अंबर या अनेक मासिकातून लिहित होते. अजुनही लेखन चालू आहे. माझी तीन पुस्तके प्रकाशित झाली. ऋणानुबंध, पाऊलवाट हे कथासंग्रह आणि साद देती हिमशिखरे हे प्रवासवर्णन. 'पाऊलवाट' या कथा संग्रहाला वि. वा. शिरवाडकर 'वाङ्मय प्रतिष्ठान' तर्फे गौरविण्यात आले. माझ्या काही कविता काव्यकुंज रोहिणी, अश्विनी इत्यादी कविता संग्रहात प्रकाशित झाल्या. अनेक कविसंमेलनात भाग घेतला. 'चंद्रकिरण' काव्यमंडळ, तळेगाव इथे मी भाग घेत असे. अनेक प्रसिध्द संस्थानी माझा सत्कार केला. ध्यानीमनी नसताना असा माझा लेखन प्रवास सुरू आहे.

लोणावळ्यात 'वसंत व्याख्यानमाला' डॉ. देसाई यांच्या वृध्दाश्रमात सुरू झाली. त्यामुळे संस्थापक स्वातंत्र्य सैनिक गुरूवर्य प्रकाशभाई मोहाडीकरांच्या यांच्या संपर्कात आले आणि अनेक मान्यवरांचा परिचय करून देण्याचे काम दिले गेले. हे माझे अहोभाग्य ! आज मला सर्वांचीच नावे आठवत नाहीत. तरी, भरत राऊत, कुमार केतकर, मंगला खाडिलकर, राम शेवाळकर, राम नगरकर, माधव वझे (श्यामची आई फेम) स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नातू प्रकाश सावरकर, श्रीराम लागू, सुधीर पाटणकर वगैरे वगैरे.

आता जीवनाच्या उत्तररंगी 'मुखपत्रिकेचे' माननीय डी. एन. नाडकर्णी यांच्या प्रेरणेतून बरेच लेखन झाले. माझ्या यशात त्यांचा मोठा वाटा आहे. तसेच अनेक वर्षे 'अंबर' या साप्ताहिक आणि दिवाळी अंकातून सातत्याने माझ्या कथा, कविता, लेख प्रकाशित करणारे माननीय सुरेश साखळकर संपादक यांचा खूप खूप वाटा आहे. यांच्याकडून या वयात लेखनासाठी ऊर्जा मिळते. दीपस्तंभा सारखे माझे लेखन उजळून टाकणारे अनेक विभूती यांच्या ऋणांत मी कायम राहीन. माझ्या लेखन प्रवासात अनेक वाचकांनी मला प्रोत्साहन दिले त्यांचे हार्दिक आभार मानते.

**- कुंदा र. देसाई**
**९८१९०५२३१९**

## डी. एन्. च्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त
## चैतन्याचा अक्षय झरा

यंदा ७ जानेवारीला आपले डी. एन्. (श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी) हे ८५ वर्ष पूर्ण करीत आहेत. मुखपत्रिकेच्या माध्यमातून सर्वच कारवारकरांच्या घरात पोहोचलेले डी. एन्. यांचे वर्णन करायचे झाले तर त्यांचा पराकोटीचा साधेपणा आणि आपल्या समाजात असलेला सहज वावर यामुळे त्यांचा उल्लेख ज्याच्या त्याच्या तोंडून 'आमगेलॉ डी. एन्. रे !' असाच होणार. तर अशी ही असामी ८५ वर्षांची होत आहे यावर विश्वासच बसत नाही. कालगणनेत काही चूक तर झाली नसावी ना ? अशी शंका येते.

चैतन्याने बहरलेल्या अशा व्यक्तीला आपल्या कोंकणी भाषेत 'आंब्या टाळॉ' (उच्चारताना आंब्या ताळॉ) म्हणतात. या आंब्याच्या डहाळीवाचून कोणत्याही शुभकार्याचा आरंभ होऊच शकत नाही. ज्ञातीतील कोणताही कार्यक्रम असो मग तो मुंबई मंचाचा असो वा ठाणे मंचाचा किंवा एखाद्या पुस्तक प्रकाशनाचा. सल्ला हा डी. एन्. चाच हवा. एखाद्या संस्थेचा शुभारंभ असेल किंवा तिला बळकटी आणण्याचे काम. त्या संस्थेची नियमावली तयार करण्यापासून, तिला लागणारे आर्थिक बळ जमवण्यापासून त्याबाबतचे हिशेब तपासून समाजाच्या पैशांचा योग्य तऱ्हेने विनियोग करून देण्यापर्यंत सर्व ठिकाणी डी. एन्. यांचा भक्कम हातभार असतो आणि तो देखील कोणताही बडेजाव न करता.

ज्ञातीच्या इतिहासापासून ते वर्तमानकाळापर्यंतचा साक्षात् चालता बोलता 'ज्ञानकोश' असल्यामुळे त्यांच्याजवळ कारवारकरांच्या प्रत्येक कुटुंबाची खडा न् खडा माहिती असते. त्यामुळे मुद्दामहून लग्न जुळवण्याचा त्यांचा स्वत:चा जरी हेतू नसला, तरी अशाप्रकारे कित्येक लग्नसंबंध त्यांच्या कळत न कळत सहज बोलता बोलता जुळून आलेले आहेत.

N.K.G.S.B. संघ आणि त्याच्याशी निगडीत Education Society या दोहोंना तन मन धनाने हातभार लावता लावतानाच 'मुखपत्रिका' हे त्यांचे लाडके अपत्य जन्माला आले. आणि आज त्याला हां हां म्हणता ४२–४३ वर्षे केव्हां झाली, हे कळले देखील नाही. दर तिमाहीला कारवारकर या मुखपत्रिकेची आतुरतेने वाट पहात असतात. (कोविडच्या या लॉकडाऊन मध्ये पहिल्या लाटेत वर्षभर छपाई करता आली नव्हती. त्यामुळे चुकल्याचुकल्यासारखे वाटते न वाटते तोच जीवनक्रम पूर्ववत जागेवर येताच मुखपत्रिकेचे वर्षभराचे चारही –अंक एकाच गठ्ठ्याने एकत्र कारवारकरांच्या हाती पडले आणि मुकलेल्या आनंदाची भरपाई झाली.)

मुखपत्रिकेचे रूप इवलेसे. पण तिच्यात काय नाही ? वेळोवेळी घडलेल्या विशेष घटनांचा वृत्तांत आणि ज्ञाति संस्थेचे भविष्यातले संकल्प सांगणारे संपादक श्री. डी. एन्. नाडकर्णी यांचे संपादकीय सुरवातीलाच असते. कधी त्याच्या आसपास येऊ घातलेला बक्षिस समारंभ,



सत्कार–समारंभ एखादी खास सभा, वैद्यकीय शिबीर, खाद्यमेळाव्याचे स्नेहसम्मेलन किंवा महिलाचा हळदीकुंकू समारंभ यांचे जाहीर निमंत्रण ठळकपणे दिलेले असते. पाठोपाठ ज्ञातीतील विवाह–वाङ्निश्चयाच्या शुभवार्ता, ज्ञातिबांधवांनी देश–परदेशात मिळविलेले यश, संशोधन, क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य, समाजकार्य तर कोणी आपला जीव धोक्यात घालून कित्येकांना दिलेल्या जीवदानाने बजावलेली बहादुरी या सर्व गोष्टींचे कौतुक करावे ते मुखपत्रिकेनेच ही झाली सुरवात. त्यानंतर ज्ञातीतील लहान–थोरांना मराठीत व इंग्रजीतही लिहिते करण्याचे कौतुकास्पद कार्य देखील मुखपत्रिकेचेच. कुणाला कविता कराविशी वाटते, कुणाला आपल्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीविषयी सांगावेसे वाटत, तर कुणाला आयुष्यातला समरप्रसंग शब्दात मांडावासा वाटतो. कुणाला जुन्या आठवणीत रंगून जावेसे वाटते, तर कुणाला 'गेले ते दिन गेले' म्हणत हळहळावेसे वाटते. या सर्वांना व्यक्त होण्यासाठी उत्तेजन देणारा मंच म्हणजे आपली मुखपत्रिका. याचबरोबर देश–विदेशात ज्यांचे निधन झाले असेल त्या व्यक्तीबद्दल तिच्या मूळ गावासह बातमी असते. आणि सर्वात शेवटी ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी संघाशी संलग्न उपक्रमांना वेळोवेळी दिलेल्या देणग्यांची माहिती देऊन त्यांच्या दातृत्त्वाविषयी कृतज्ञता व्यक्त केलेली असते. अधूनमधून मिश्किल चुटकुले, कोंकणी ग्यादी(म्हणी) आणि छोट्या मोठ्या जाहिराती तर आहेतच. आणि हा सर्व परिपूर्ण मजकूर अवघ्या २५ ते ३० पिटुकल्या पृष्ठसंख्येत मांडण्याचे कौशल्य दाखवावे ते डी. एन्. शिवाय कोणी? हा मुखपत्रिकेचा 'चिमुकला संसार' म्हणजे प्रत्यक्षात तो संपूर्ण ज्ञातीचे व्यक्तिमत्त्व दाखविणारा आरसा आहे.

डी. एननी संपादित केलेल्या अनेक स्मरणिका (souvenirs) त्यांच्या परिस्पर्शाने खरोखरीच्या संस्मरणीय झाल्या आहेत. उदा. आपल्या संघाच्या अमृतमहोत्सवानिमित्त निघालेली स्मरणिका, तसेच अलीकडेच 'मिनी कारवार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जोगेश्वरीतील सरस्वती बागेच्या शताब्दीमहोत्सवाची आकर्षक स्मरणिका, यांच्या रूपाने संस्थेचा संपूर्ण इतिहास त्यातील जुन्या–नव्या छायाचित्रांसह आपल्या संग्रहात रहातो. त्यात आपण आपल्या समाजासाठी करून ठेवलेला आहे. त्याच्या संग्रहातली अनेक कागदपत्रे, संदर्भ ग्रंथ, वडीलधाऱ्यांकडून तोंडी गोळा केलेली माहिती त्यामुळेच हे साध्य झाले आहे. हे नुसते वानगीदाखल सांगितले आहे. याहून अधिक 'रेकार्ड' त्यांच्यामुळे आपल्या संघाच्या दफ्तरात दाखल झालेले आहेत. पुढील कैक पिढ्यांना आपले 'roots' शोधताना डी. एन्. ना धन्यवाद द्यावे लागतील. त्यांनी तयार केलेल्या अनेक कुटुंबांच्या वंशवृक्षांमुळे कित्येकांना आपापले पूर्वज कळतात.

व्यवसायाने इंजीनियर म्हणजे विज्ञान शाखेकडील असून सुध्दा इंग्रजी, संस्कृत, मराठी, कोंकणी या भाषांवरचे त्यांचे प्रभुत्त्व विलक्षण आहे. व्यवस्थापन (management) तर

त्यांच्या रक्तात भिनलेले आहे. त्यांच्याशी झालेल्या सहज संभाषणातून मग ते समोरासमोर असो, वा टेलिफोनवर. त्यांच्या सर्व क्षेत्रातला अनिरुध्द संचार, व्यासंग, हजरजबाबीपणा, अफाट स्मरणशक्ती यांचा अनुभव येतो. आणि तो ही सहजपणे. ऐकणाऱ्याला आपल्या बरोबरीने वागवीत. कधी बाल सुलभ उत्सुकतेने एखाद्या शब्दाचे मूळ शोधण्याचा वेध घेतील, तर कधी एखाद्या खास कोंकणी शब्दाची किंवा म्हणीची खासियत दाखवून देतील.

श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांचे कार्य बाहुल्य पाहून त्यांनी त्यांच्या गुरूस्थानी असलेले आणि रास्त अशा योगायोगाने आद्याक्षरात साम्य असलेले कै. डी. एन्. नाडकर्णी (दिगंबरमामा ऊर्फ डी. एन्.) आज असते तर त्यांनी कौतुकाने पाठ थोपटताना '' शिष्यात् इच्छेत् पराजयम्'' असे उद्गार नक्कीच काढले असते.

असा हा सदैव कार्यरत रहणारा, सर्वांना आपल्या मायेची छाया देणारा वटवृक्ष आरोग्यपूर्ण आयुष्य लाभून चैतन्याने अविरत सळसळत राहो, हीच श्री मंगेश शांतादुर्गा चरणी प्रार्थना !

**मृदुला भांडारकर** ९३२२२ ३६२५७

**शब्दांकन : शैलजा नाडकर्णी** ९८२०१ ७९३८५

## ज्ञातीतील वैद्यकीय क्षेत्रातील सल्लागारांना सुवर्ण संधी

आपल्या ज्ञातीतील सुप्रसिध्द कामगार नेते कॉ. बी. एस्. धुमे यांची कन्या विद्या धुमे हिने आपल्या वडिलांच्या नावे स्थापन केलेल्या 'कॉ. बी. एस्. धुमे चॅरिटेबल ट्रस्ट' द्वारे आता अंधेरी पश्चिम येथे पॉलिक्लिनीक सुरू करण्यात आलेले आहे.

आजच्या काळात गगनाला भिडलेले जागेचे भाव पाहता ज्या नवोदित तसेच होतकरू डॉक्टरांना स्वत:ची प्रॅक्टीस सुरू करण्याची अथवा आपली असलेली प्रॅक्टीस वाढवण्याची इच्छा असेल अशा डॉक्टरांसाठी ही सुवर्णसंधी ठरू शकेल. ही जागा अगदी मोक्याच्या जागी म्हणजे अंधेरी स्टेशनपासून पाच मिनिटे चालत जाण्याच्या अंतरावर आहे.

इच्छुक डॉक्टरांनी कृपया खालील नंबरवर संपर्क साधावा.

**– विद्या धुमे : ९३२४२ ७३४९३**



## एज्युकेशन सोसायटीची नवी कार्यकारिणी

२७ नोव्हेंबर २०२१ रोजी आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२१ –२४ या कालावधीसाठी नव्या कार्यकारिणीच्या सभासदांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर भरलेल्या कार्यकारिणीच्या पहिल्या सभेत या तीन वर्षासाठी खालील पदाधिकाऱ्यांची निवड झाली.

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : **देवदास अनंत नाडकर्णी** |
| उपाध्यक्ष | : **डॉ. विवेक सुधाकर कुलकर्णी** |
| कार्यवाह | : **प्राची प्रदीप देसाई व राजीव दिनकर गायतोंडे** |
| खजिनदार | : **गणपती महेश्वर नाडकर्णी व उदय महाबळेश्वर नाडकर्णी** |
| सभासद | : **प्रदीप नीलकंठ देसाई, अरविन्द वासुदेव भट, गीता संझगिरी** |

### एज्युकेशन सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

जुलै २०२१ च्या मुखपत्रिकेत गुणवंत विद्यार्थ्यांकडून त्यांना बक्षिसे प्रदान करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते. अर्ज स्वीकारण्याची नवीन अंतिम तारीख २५ जानेवारी २०२२.

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनांत २०२१ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृति चिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलिफोन नंबर १० फेब्रुवारी २०२२ पर्यंत संघाच्या पत्यावर पाठवून किंवा टेलिफोनवर कळवून आम्हांस उपकृत करावे.

**१० फेब्रुवारी नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची कृपया दखल घ्यावी.**

## ठाणे मंच रौप्य महोत्सवी सोहळा
### ज्ञातीतील कलाकारांना आवाहन

या अंकाच्या पृ. ४ वर २० मार्चला होणाऱ्या ठाणे मंच रौप्य महोत्सव सोहळ्याची निमंत्रण पत्रिका छापलेली आहे. त्या सोहळ्याच्या दुसऱ्या सत्रांत विविध करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले आहेत.

- गणेश वंदना / सरस्वती वंदना
- गायन
- हिंदी, मराठी गाण्यावर एकल (सोलो) नृत्य, समुह नृत्य

ज्या कलाकारांना सहभागी व्हायची इच्छा असेल त्यांनी लवकरात लवकर खालील कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा. वयाची अट नाही.

**संपर्क**

| **सुरेश पालेकर** | **अरुण वाघ** | **राजेश दिवेकर** |
|---|---|---|
| ८९२८८ ५०१९३ | ९८२०३ ७७१०२ | ९६१९३ ६२४६० |
| ९९६९४ ५५३७०(व्हॉटस् अॅप) | | |

## कोंकणी भक्तांस आवाहन

आखिल भारतीय कोंकणी परिषदेच्या स्थापनेला अलीकडे ८२ वर्षे पूर्ण झाली. परंतु आतापर्यंत परिषदेची स्वत:ची वास्तु घेण्याचे स्वप्न प्रयत्न करूनही पूर्णत्वास आलेले नाही.आम्हाला कळविण्यास आनंद होत आहे की आता हे स्वप्न पूर्ण होण्याचा योग जुळून येत आहे. 'आस्मिताय प्रतिष्ठान' नावाची एक सामाजिक संस्था यासाठी थोडीफार आर्थिक मदत देण्यास तयार आहे. पण त्यांनी देवू केलेली रक्कम वास्तु घेण्यास अपुरी पडते.

स्वत:ची वास्तु असणे ही परिषदेची गरज आहे. म्हणून परिषदेने ठरविले की एक वास्तु घ्यावी व आपली इच्छा पूर्ण करावी. यासाठी दाते व परिषदेचे सभासद यांच्याकडे आर्थिक साहाय्यासाठी आवाहन करण्याचे ठरविले. सध्या वास्तु घेण्यासाठी आम्हाला सुमारे सहा लाख रुपये कमी पडतात.

या वास्तूचे उद्घाटन आपल्या सहकार्याने जानेवारी २०२२ मध्ये आयोजित करण्यात येत आहे. आपली मदत लाख मोलाची आहे. परिषदेचे ८२ वर्षाचे स्वप्न आपल्या मदतीच्या हस्ते पूर्ण होणार आहे. परिषद सदैव आपल्या ऋणात राहील. २५ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम देणाऱ्यांची नावे दर्शनीय फलकावर लावण्यात येतील.

देणगी देण्यासाठी तपशील

खातेदाराचे नाव : **All India Konkani Parishad**
बँकेचे नाव : **Union Bank of India** शाखा : **Panaji**
खाते क्रमांक : **520101219536208** **IFSC Code : UBIN0902594**

**संपर्क : सौ. उषा राणे : अध्यक्ष, अ. भा. को. प. ९४४८९४७१२९**
**गौरीश वेर्णेकर : संयुक्त कार्यवाह ८२०८२७६३६१, ९२७००४५८२०**






kunalconstructiongoa@yahoo.in GOA RERA NO: PRGO05180314

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| दीक्षा महेश हंसवाडकर, धारवाड | व | संकेत नायक, कारवार |
| राहुल उदय नाडकर्णी, अंधेरी | व | मधुरा नागेश भांगले, मालाड |
| निनाद गुरुदास वाघ, माहीम | व | मुग्धा पुरुषोत्तम देसाई, बोरीवली |
| मयुरेश गिरीश वाघ, अंधेरी | व | सुप्रिया प्रदीप कोळसकर, उदेपूर |
| गौरव प्रशांत वागळे, ठाणे | व | शाल्मली शिरीष रेवणकर, कांदिवली |
| तेजस सतीश वागळे, बोरीवली | व | पवित्रा पिल्ले, मुंबई |
| रश्मी राजन वागळे, प्रभादेवी | व | केतन मुकुंद किंकाळे, मुंबई |
| मिताली गिरीश वर्टी, अटलांटा | व | पुष्कर गुरुप्रसाद शिरवईकर, टेक्सास |





# प्रतिक्रियेवर प्रतिटोला

**'वामनाश्रम एक आनंदाश्रम' – मुंगेरीलाल के हसीन सपने**

या प्रतिक्रियेवर मला खूपच आनंद झाला ! बऱ्याच गोष्टींची खात्री पटली–पहिली खात्री म्हणजे माझे लेख निश्चितच बरेच ज्ञातीबंधू वाचतात. लिखाण योग्य–अयोग्य आहे ते मनाशी ठरवितात. थोडक्यात जे लिहिले आहे त्याची पूर्णपणे दखल घेतात. दुसरी खात्री म्हणजे माझे लेख त्यांना निश्चितच विचार करावयास लावतात. ही माझ्या दृष्टीने खूपच जमेची बाजू आहे.

माझे परममित्र श्री डी. एन्. नाडकर्णी ह्यांनी माझ्या एका लेखाची गेल्या अंकात 'वामनाश्रम एक आनंदाश्रम' ची जी चिरफाड केली आहे त्याची दखल घेऊया –

**(मुखपत्रिका वर्ष ४३, क्र ३, ऑक्टोबर ते डिसेंबर, २०२१, पान नं.८)**

**१) ''माझा परममित्र श्री. अरुण कसबेकर यांचा मुखपत्रिकेच्या मागील एका अंकात '' वामनाश्रम एक आनंदाश्रम'' हा लेख प्रसिध्द झाला होता. सदर लेख अरुणने अनेकांना वाचून दाखवला होता असे समजते. अशावेळी सर्वजण '' वाईटपण कित्याक'' म्हणून खोलात न जाता '' लेख बरो आसा'' म्हणून मोकळे होतात. पण '' अप्रियस्य च पथ्यस च वक्ता श्रोता च दुर्लभ:'' या सुभाषितानुसार मित्रप्रेमापेक्षा समाजहित हे जास्त महत्वाचे म्हणून या तिखट प्रतिक्रियेचा प्रपंच ''**

लेख वाचून दाखविण्यात काही ठळक उद्देश असतात. जे लिहिले आहे ते सत्य आहे ना ? जी माहिती दिली आहे ती वस्तुस्थितीला धरूनच आहे ना ? हे सर्व जाणून घेणे फारच महत्वाचे असते. शिवाय काहीजण या संदर्भात बऱ्याच गोष्टींवर प्रकाश पाडतात, चुका सुधारतात. त्यामुळे लेखांत आवश्यक सुधारणा करणे तसेच सत्यपरिस्थिती ज्ञातीबंधूंसमोर आणणे सोपे होते.

लेख प्रकाशित झाल्यावर बऱ्याच जणांचे फोन आले आणि अजूनही येतात. काही जणांनी वामनाश्रमाची खूपच माहिती दिली. इतकेच नव्हे तर वामनाश्रमच्या ट्रस्टींनी, एन.के.जी.एस.बी. संघाला सन १९८९ म्हणजे ३२ वर्षापूर्वी पाठविलेल्या पत्राची कॉपी तसेच पत्राबरोबर मे १९३८ मध्ये म्हणजे जवळजवळ ८३ वर्षापूर्वी रजिस्टर झालेल्या वामनाश्रम ट्रस्टडीडच्या ओरिजनल प्रतीची झेरॉक्सपण पाठवली आहे. मी जर या व्यक्तींना लेख पूर्ण करण्याआधी फोन केला असता, तर वामनाश्रमाबद्दल बरीच माहिती विस्तारपूर्वक देऊ शकलो असतो. म्हणूनच लेख वाचून दाखविण्याचा प्रपंच !

**२) '' वामनाश्रमाचा कारवार येथील भूखंड गेली कित्येक वर्षे '' हर्साच'' पडून आहे. सातबाराच्या उताऱ्यात कुठल्याही व्यक्तीचा उल्लेख नाही. तेथे वास्तू उभारायची असेल तर नगरपालिकेला देण्यात येणाऱ्या अर्जावर भूधारकाची स्वाक्षरी लागेल. मूळ विश्वस्तापैकी एकही हयात नाही. '' त्यामुळे मालकच अस्तित्वात नाही. थोडक्यात भक्कम पायाच नसेल तर इमले कसे बांधणार, उगाच स्वप्नरंजन करण्यात काय अर्थ आहे ? मुंगेरीलाल के हसीन सपने !**

**सध्या कारवार येथे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेही ज्ञातिबांधव नाहीत, जे आहेत त्यातील कुणालाही या बाबतीत पुढाकार घ्यायची ताकद नाही, कर्तबगारी नाही, वेळ नाही व रस नाही. भूखंडावर अतिक्रमण होऊ नये म्हणून त्याना साधा पागारही बांधायला जमले नाही. सुमारे दोन दशकांपूर्वी ही जागा कैवल्यपूर मठाधीशाकडे सुपूर्द करण्याचे ठरले होते. पण पुढे प्रगती शून्य.''**

कारवारात बोटावर मोजण्याइतकेही आपले बांधव नाहीत. पण त्याला इलाज नाही. आपल्या गौड सारस्वत ब्राह्मण (जी.एस.बी.) ज्ञातीतील बांधवांवर देवी सरस्वतीचा वरदहस्त आहे. त्यामुळे स्वत:च्या कर्तृत्वावर, बुध्दीमत्तेवर विश्वास ठेऊन आपला बांधव कारवार सोडून केवळ देशातच इतरत्र गेला नाही, तर जगाच्या पाठीवर अनेक ठिकाणी जाऊन आपल्या नैपुण्याने आपल्या ज्ञातीचे नांव त्यानी खूपच वर आणले आहे. पण मला खात्री आहे की, आपल्या जुन्या / नव्या पिढीतील प्रत्येक सदस्य, ज्याचे कारवारात शालेय / कॉलेज शिक्षण झाले आहे, तो कारवारला भले वर्षातून काही दिवस तरी जायला तळमळत असतो आणि इतर नव्या पिढीतील जी.एस.बीं.ना कारवारबद्दल खूपच उत्सुकता आहे.जर लेखांत सांगितल्याप्रमाणे वामनाश्रमातील १० खोल्या जर अस्तित्वात आल्या व कारवारबाहेरील वास्तव्य केलेल्या जी. एस.बी. ना जर ही बातमी कळली तर मला खात्री आहे की आपले जी.एस.बी. कारवारी बांधव याचा जरूर फायदा घेतील. स्वस्त आणि सर्व सुखसोयीयुक्त खोल्या, मनासारखा मत्स्याहार, तसेच अथांग पसरलेला कारवारचा समुद्र आणि समुद्रावेळ तसेच जुन्या आठवणी ! नव्या पिढीला एक उत्तम पर्यटन स्थळ म्हणून सुध्दा कारवार खूपच पसंत पडेल. दोन दशकांपूर्वी ही जागा आपल्या परमपूज्य स्वामीजींना सुपूर्द करण्याचे ठरले होते. पण प्रगती झाली नाही. यावर मी काही लिहिणे उचीत समजत नाही. कारण त्यावेळच्या विश्वस्तांचे या बाबतीत, त्यांच्या उदासीनतेचे काय कारण असावे हे मला माहीत नाही. शिवाय वीस वर्षापूर्वीचे विश्वस्त, आता कदाचित हयातसुध्दा नसावेत. डी.एन. नी सुचविल्याप्रमाणे जागा ताब्यात घेऊन विकली असली तरी मठाला बरेच पैसे मिळाले असते.

३) **'' समजा जागा स्वामीजींच्या ताब्यात आली तर अरुणच्या वास्तु बांधण्याच्या स्वप्नांची मदार बँकेवर आहे. बँकेने बांधकामाचा खर्च करावा वगैरे मोठ्या मोठ्या उड्या. हे सर्व फजूल आहे. अरुणच्या स्वप्नानुसार पहिल्या मजल्यावर सुसज्ज दहा गाळे बांधावे, ते सांभाळणारी मंडळी कोण व तेथे कोण राहणार ?''**

लेख लिहिण्याआधी या बाबतीत मी एका वरिष्ठ बँक अधिकाऱ्याशी चर्चा केली होती आणि त्याने अगदी स्पष्टपणे सांगितले की, या प्रपोजलवर कुठलीही बँक तयार होईल जर ती जागा बँकेला ब्रँच किंवा बँकेच्या इतर कामासाठी उपयुक्त वाटल्यास ! आणि माझ्या मते ती जागा निश्चितच बँकेला उपयुक्त आहे.



मला समजत नाही की, हे दहा गाळे सांभाळणे डी. एन.ना एवढे अडचणीचे का वाटावे ? देवी शांतादुर्गा देवळाच्या परिसरात असलेले किती तरी जास्त गाळे अगदी चांगल्या रीतीने सांभाळले जातात. या निमित्ताने एखाद्या जी. एस.बी. तरुणाला कारवारातच नोकरी मिळेल. जर अगदीच जबाबदारी घेण्याची मठाची इच्छा नसेल तर एखाद्या जी.एस.बी. ला ती वास्तु 'चालविण्यासाठी' देणे, त्यांत मठाला चांगलीच रक्कम दरमहा कायमची मिळेल ती सुध्दा पदरचा एक पैसा न घालता आणि मला खात्री आहे की बरेच जी.एस.बी. बांधव अश्या कॉन्ट्रॅक्टला तयार हेतील–नव्हे तयार आहेत !

४) **'' अरुण म्हणतो, ''स्वत:ला पाहिजे तसा मत्स्याहारासह आठवडा, दोन आठवडा कारवारला मस्त वास्तव्य'' वगैरे, मुखपत्रिकेमुळे मी गेली चाळीस वर्ष ज्ञातिबांधवांच्या संपर्कात आहे व त्यांची मानसिकता मला माहीत आहे. तेव्हा मी जबाबदारीने सांगू शकतो की, कोणीही कारवारला गेलाच तर सातेबाजाराशी संलग्न दोन किंवा तीनच दिवस राहील व हॉटेलमध्ये राहणे पसंत करेल. ''**

अगदी बरोबर ! पण आधी आपल्या ज्ञातीबंधूंची मानसिकता व त्यात वेळोवेळी झालेले बदल लक्षात घेणे आवश्यक आहे. बहुतेक गौड सारस्वत ब्राह्मणांना विद्यार्जनात खूप रस आहे. कितीही गरीब असलेल्या जी.एस.बी.ची सुध्दा मनोमन इच्छा असते की त्यांच्या मुलांना चांगले शिक्षण लाभावे. आम्ही विद्यार्थीदशेत असताना कारवारांत एकही कॉलेज नव्हते. तेंव्हा उच्च शिक्षणासाठी मुलांना नाईलाजाने धारवाड, मुंबईला जावे लागत असे.

पुढे नोकरीधंद्यानिमित्त भारतात कुठेही जाण्याची त्यांना अशी मानसिकता तयार झाल्याने पुढच्या पिढीला उच्च शिक्षणासाठी भारतातच नव्हे तर जगाच्या पाठीवर कुठेही पाठविण्याची हिंमत आली. पण कारवारबद्दलचे त्यांचे प्रेम तसुभरही कमी झाले नाही.

आपल्या कारवारांत आणि जवळपासच्या परिसरांत अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. पण ती दाखवायला काहीच चोख तसेच सुरक्षीत व्यवस्था नाही. लेखात लिहिल्याप्रमाणे– '' अनुभव ट्रॅव्हल्स'' सारखा ट्रॅव्हल एजंट कारवारला लाभला असता तर प्रत्येक कारवारी आपला मुक्काम २–३ दिवस नाही तर २–३ आठवडे ठेवायला आसुसला असता.

आता तुम्हीच सांगा. आपल्या ज्ञातीतील किती जणांनी आपल्या सबंध आयुष्यात– देवगड, मधलिंगगड, कुरुमगड, आजाद्वीपला एकदातरी भेट दिली असेल ? फारतर शाळेतून देवगडाची ट्रिप काहींनी जरूर केली असेल, पण बाकीची स्थळे आपण अजूनही दुरुनच न्याहळत आहोत. कधी त्यांना भेट देण्याचा प्रसंगच आला नाही. कारण योग्य, चोख आणि सुरक्षित व्यवस्था अजूनही करवारला नाही. कारवारच्या ५० की.मी. परीघात इतकी सुंदर सुंदर स्थळे आहेत अशी स्थळे जर जपान, युरोप वगैरे ठिकाणी असती तर आपणच ती बघायला भरपूर खर्च करुन जपान युरोपला गेलो असतो. काय हा दुर्विलास ! मी स्वत: संपूर्ण जग अनेकदा

पालथे घातले आहे आणि तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की, सृष्टी सौंदर्याच्या बाबतीत कारवारचा नंबर बराच वर लागेल. आजकाल कारवारमध्ये सुध्दा ओनरशिप फ्लॅट्स बांधणे जोरात चालू आहे आणि असे बरेच कारवारकर आहेत ज्यांनी आपले बंगले विकून कारवार सोडले होते, त्यांनी अश्या इमारतीमध्ये ओनरशीप फ्लॅट घेऊन ठेवले आहेत. फारच उत्तम निर्णय ! बंगल्याच्या रखवालीचा तसेच डागडुजीचा खर्च आणि त्रास नाही. कधी कारवारला येऊन रहाण्याची चोख व्यवस्था ! फ्लॅटच्या मालकाचे नातेवाईक, मित्र मंडळीसुध्दा अश्या फ्लॅटचा उपयोग घेतात आणि दोन आठवडे तरी निश्चिंत राहतात.

डी.एन. जी आपण आपल्या लोकांच्या मानसिकतेचा जो उल्लेख करतात ती बदलायला जरासुध्दा वेळ लागणार नाही. फक्त आरामांत रहाण्याची, आपल्या आवडीप्रमाणे मत्स्याहार बनवून घेण्याची आणि एका ट्रॅव्हल एजंटची कारवारांत सोय झाली पाहिजे आणि सुरवात या दहा खोल्यांपासून व्हावी अशी देवीकडे प्रार्थना !

५) **‘‘सरळ आणि साधा पर्याय म्हणजे मठाधीशांनी कायदेकानूनच्या आधारे हा भूखंड ताब्यात घ्यावा व तो निमूटपणे विकून टाकावा व मिळालेली रक्कम सदाशिवगडच्या मठाच्या जीर्णोध्दारासाठी वापरावी, खरेदीकाराला एकच अट घालावी की नूतन वास्तूचे नाव वामनस्मृती वामनभुवन, वामनकृपा वा तत्सम ठेवावे.’’**

वरील अगदी निराशाजनक पर्याय आपल्या डी.एन. कडून येणे शक्यच नाही. कारण आपल्या समोरच आहे–

एक डी.एन. नाडकर्णी नावाचा ८५ वर्षाचा तरुण अविरत प्रयत्न करून मुखपत्रिकेचा प्रत्येक अंक आपल्या हातात अगदी वेळेवर पडावा, याची चोख व्यवस्था करतो. तेही गेली ४० वर्षे न चुकता !

सर्व माहिती गोळा करणे – केवळ भरतातच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यांत कोणी एका जीएसबी ने किती भरारी मारली त्याची इत्थंभूत बातमी देणे ! कोण, कधी व कुठे जन्माला आला आणि खपला याचा सविस्तर तपशील ! फक्त हाच जीएसबी देऊ शकतो तेही एकहाती–विना–अनुदान–कधी कधी पदरचे खर्च करून, ही मुखपत्रिका वेळेवर आपल्या हाती देतो. असा कर्तबगार माणूस इतके निराशाजनक उपाय मठाला कसे सुचवू शकतो ? हाच एक संशोधनाचा विषय ठरेल.

माझ्या मते नूतन वास्तूचे नाव वामनाश्रमच ठेवावे तेच योग्य ठरेल.

ही मुखपत्रिका जगभर पसरलेल्या जीएसबींना ज्ञातीबद्दल, ज्ञातिबांधवांबद्दल तसेच ज्ञातीतील घडामोडींबद्दल इत्थंभूत माहिती देणारा केवळ एकच दुवा आहे.

**– अरुण भास्कर कसबेकर,** ९८२०२ ९१३६५ / ८७७९९ ८६६०६




# सर्व कारवारकरांना जाहीर खुशखबर !

१. **तुम्हाला जर कारवारांत एक किंवा अधिक बेडरुमचे गाळे (Flats) चांगली क्वालिटी तसेच योग्य किंमतीला हवे असतील तर ...**

२. **तुम्हाला कारवार – परिसरांत असलेली तुमची / वडिलोपार्जित जागा योग्य किंमतीला विकण्याची इच्छा असेल तर ...**

३. **कारवारात असलेल्या तुमच्या / वडिलोपार्जित जागेवर आमच्या सहकार्याने ओनरशीप फ्लॅटस् वगैरे बांधण्याची तुमची जर इच्छा असेल तर ...**

**आम्ही आपल्या सेवेस हाजीर आणि तत्पर आहोत.**

## SAISH CONSTRUCTION

Office : Geetanjali Theatre, Karwar
Proprietor : **Rahul Subodh Borkar**
Sukhsagar, Vaman Ashram Road,
Karwar - 581 301.
**Email ID : directorsaishconstruction@gmail.com**
**Contact : +91 98457 93234 / 73898 93639**

## OUR PERFORMANCE SO FAR

1. We have successfully completed three projects in Karwar during last 10 years and the fourth one is a commercial + residential project which is at the stage of giving possession.
2. It has in addition to Commercial Showrooms and Shops - 1 BHK (740 Sq.ft.) 2 BHK (1000 Sq.ft.) residential flats.

# सरस्वती बाग येथील कुटुंबवत्सल चंपू



सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील पार्वती दिनकर गायतोंडे म्हणजे सर्वांची आवडती चंपू म्हटले की मला माझे माहेरचे चित्र डोळ्यासमोर येते. आम्ही पाच भावंडे, तीन बहिणी व दोन भाऊ. सरस्वती बागेत आमचा दुमजली बंगला. सभोवताली मोठी बाग.

आमच्याकडे नात्यांतल्या लोकांचे सदैव येणेजाणे असे. माझी ठाण्यातली पाचू आत्या आपल्या मुलांना घेऊन माहेरपणासाठी आठदहा दिवस घालवायची. तसेच सरस्वती बागेतील जवळ राहणारी बायआत्या तीही येऊन जाऊन असे. बाय आत्या म्हणजे बाळमामा नाडकर्णी यांची पत्नी. थोडक्यात सर्व नातलगांना आमच्याकडे येण्याची ओढ होती व त्याचे मुख्य कारण म्हणजे कुटुंबवत्सल चंपू.

आमची बाग तऱ्हेतऱ्हेच्या फुलझाडांनी बहरलेली असे व चंपू स्वत: बागेची संपूर्ण जबाबदारीने काळजी घेत असे. फुलझाडांमध्ये कवठी चाफा, जाई-जुई, मोगरा या फुलांची रेलचेल असे. दरवर्षी पहिल्या फुलांचा गजरा किंवा फूल माहेरची 'धूव' म्हणून ती बायआत्याला पाठवीत असे. ती जवळच रहात असल्याने तिच्याकडून आम्हां भावडांचे खूप लाड होत.

चंपू कैरीचे लोणचे खूपच छान बनवीत असे. दरवर्षी चार पाच बरण्या लोणचे बनवीत असे. तसेच आमच्या दहिसरच्या शेतावरून खूप चिंच येत असे. त्याचे गोळे बनवून नातलगांना देण्याचा चंपूचा शिरस्ता होता. ते गोळे बनविणे एक कठीण काम असे ते करताना मात्र तिला दोनतीन महिलांची मदत घ्यावी लागे. चिंच वाळवून, चिंचोके काढून तेल मीठ घालून कुटुन त्याचे गोळे बनविणे ही एक पाककलाच म्हणावी लागेल. जाई,जुईंच्या फुलांची 'फाती' करण्यात तर चंपू निष्णात होती. त्यात तिचा हात धरणारा कोणी नव्हते. कैरीचे लोणचे तर इतके चवीष्ट बनवायची की कितीतरी बायका माप विचारायला यायच्या व तीही आनंदाने सांगायची.

चंपू गृहकामात इतकी व्यस्त असूनही आम्हा भावंडाचे तिने खूप प्रेमाने व काळजीने संगोपन केले व उत्तम संस्कार केले.

अशी हाती आमची आई चंपू...

**स्मिता बोरकर,** पुणे
(पूर्वाश्रमीची दुर्गा (दुर्गी) गायतोंडे)
९६१९३ ४४८३७



## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस,
अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

SERVICE FIRST®

98193 04599

99204 04599

सर्वप्रथम सेवा®

SOCIETY SERVICE RESOURCE

## निधन

| | | |
|---|---|---|
| गीता विश्वनाथ आगशीकर | | |
| (पूर्वाश्रमीच्या शांता (बेबी) नारायण तेलंग | (बाड) | माहीम |
| सुमन गोविन्द बोरकर | (कडवाड) | पुणे |
| कुमुद शामराव बोरकर | (कोडीबाग) | चर्चगेट |
| सुधा शरत् दिवेकर | (कणसगिरी) | दादर |
| रंजना केशव गुळगुळे | | |
| (पूर्वाश्रमीच्या रंजना प्रभाकर कुलकर्णी) | (हळगे) | माहीम |
| शैलेजा महारुद्र हिचकड | (अंकोला) | विरार |
| अजित भास्कर कसबेकर | (खारगे) | ठाणे |
| शरद भालचंद्र कुलकर्णी | (हळगे) | दादर |
| वसंत शंकर कुलकर्णी | (किन्नर) | अमेरिका |
| दिगंबर कृष्णराव कुलकर्णी | (अवर्सा) | पुणे |
| मोहन दत्तात्रय मुझुमदार | (अंकोला) | पारले |
| शालिनी मनोहर नाडकर्णी | (सावरपै) | पुणे |
| सावित्री सदानंद नेत्रावळी | (अंकोला) | गोवा |
| सरोजिनी चंद्रकांत रेगे | | |
| (पूर्वाश्रमीच्या सरोजिनी दिगंबर देसाई) | (कडवाड) | कारवार |
| रेखा अशोक टेंबूलकर | | |
| (पूर्वाश्रमीच्या रेखा गोविन्द नाडकर्णी) | (सांवरपै) | माहीम |
| पुष्पा प्रभाकर तेलंग | (केरवडी) | ठाणे |
| सीमा गुरुदास तेलंग | (बाड) | जोगेश्वरी |
| उषा प्रमोद तेलंग | (हळदीपूर) | माहीम |
| अरविन्द काशिनाथ वर्टी | (सदाशिवगड) | जोगेश्वरी |
| निर्मला(प्रेमा) श्रीपाद बोरकर | (सदाशिवगड) | पारले |
| सुलोचना अभय राऊत | | |
| (पूर्वाश्रमीच्या सुलोचना मनोहर तेलंग) | (नंदव्हाळ) | अंधेरी |


**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**
**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**
Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**
**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**
**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**




### संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या
### (मागील अंकानंतर) उल्लेखनीय देणग्या

**श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ**
**वृध्दसेवानिधीसाठी आमखी पन्नास हजार रुपयांची देणगी**

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी हे ज्ञातीच्या संदर्भातील क्षेत्रात विशेष रस घेत असत. त्यांनी व त्यांच्या पश्चात आप्तेष्टांनी अनेक वेळा संघाला भरघोस देणग्या दिल्या आहेत. गेल्या वर्षी त्यांचा नातू श्री. कवीश दुर्गानंद (मच्छिंद्र) कसबेकर, नातसून अरुंधती व पणती रिया यांनी वृध्दसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली होती. अलीकडेच त्यांनी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. दत्तात्रय भवानी कसबेकर यांच्या पहिल्या पुण्यतिथी प्रसंगी**
**वृद्धसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी**

पारले येथे राहणारे श्री. दत्तात्रय भवानी कसबेकर यांचे ऑगस्ट २०२० मध्ये निधन झाले होते. त्यांच्या प्रथम पुण्यतिथी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे बंधू सर्वश्री नारायण व रमाकांत यांनी वृध्दसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. मलप्पा तेलंग यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन**
**सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी**

भांडुप येथे राहणारे मलप्पा (मधु) विश्वनाथ तेलंग यांचे सप्टेंबर २०१४ मध्ये निधन झाले होते. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे चिरंजीव श्री. अविनाश यांनी वडिलांच्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. मंगेश बोरकर यांच्यातर्फे वृध्दसेवानिधीसाठी**
**पन्नास हजार एक रुपयांची देणगी**

माहीम येथे राहणारे श्री. दिगंबर शंकर बोरकर यांचे ३० डिसेंबर २०२० रोजी निधन झाले होते. त्यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी त्यांचे धाकटे बंधू पारले(प) येथील श्री. मंगेश शंकर बोरकर यांनी आपले मोठे दोन बंधू श्री. मनोहर (भाऊ) व श्री. दिगंबर (अण्णा) यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवानिधीसाठी पन्नास हजार एक रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

१. पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त अनामिकेकडून ५,०००
२. पूर्वजांच्या स्मरणार्थ श्री. पराग गजानन वागळे यांजकडून १,००१
३. श्रीमती नीशा वेंगसरकर यांजकडून १०,०००
४. श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २५व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून १,००१
५. यमुनताई, सपाताई व सिंधूताई या बहिणींच्या स्मरणार्थ भाऊबीजे निमित्त श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून ३,००३
६. दिवाळीच्या समारंभानिमित्त श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून ११.०००
७. श्रीमती सिंधू सच्चिदानंद नाडकर्णी यांच्या १०व्या पुण्यतिथी प्रसंगी नाती कु. सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून ५,०००
८. श्रीमती विजयालक्ष्मी दिगंबर नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ नातू अमीत रोहिदास नायक यांजकडून ११,००१
९. श्रीमती सुमित्रा व श्री. मारुती (मता) बोरकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. शरद यांजकडून १०,०००

## वृद्धसेवा निधीसाठी

१. श्री. शिवानंद महाबळेश्वर कसबेकर यांच्या १० व्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती रूपा कृष्णा कामत व नातू सौमिल कृष्णा कामत यांजकडून ५,०००
२. श्रीमती मीरा व श्री. गोपाळ सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र सर्वश्री मिलिंद व निमीष यांजकडून ५,००१
३. श्रीमती मालती व श्री. दिनकर वामन वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती रेखा मिलिंद तेलंग व मीनल सतीश बुजले यांजकडून ५,०००
४. श्री. शंकर दत्तात्रय देसाई यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. दत्तात्रय (समीर) यांजकडून ५,०००
५. श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २५ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून १,००१



६. श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ नातू श्री. कवीश दुर्गानंद (मच्छिंद्र) कसबेकर, नातसून श्रीमती अरुंधती व पणती कुमारी रिया यांजकडून ५०,०००
७. श्री. दत्तात्रय भवानी कसबेकर यांच्या पहिल्या पुण्यतिथी निमित्त बंधू सर्वश्री नारायण व रमाकांत यांजकडून ५०,०००
८. श्री. मनोहर (भाऊ) शंकर बोरकर व श्री. दिगंबर (अण्णा) शंकर बोरकर यांच्या स्मरणार्थ अण्णांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी बंधू मंगेश शंकर बोरकर यांजकडून ५०,००१

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

१. श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. पराग यांजकडून २५,०००

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१. श्री. विश्वनाथ मलप्पा तेलंग यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. अविनाश यांजकडून ५०,०००
२. श्री. रमाकांत भवानी बोरकर यांच्या २५व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून १,००१
३. श्रीमती नीता श्रीकांत वागळे यांजकडून खालील आप्तेष्टांच्या नांवे
    १. श्रीमती पुष्पा श्रीकांत वागळे
    २. श्रीमती नीता श्रीकांत वागळे
    ३. श्री. अशोक नारायण वाघवडेकर
    ४. श्री. मंगेश ना. वाघवडेकर
    ५. श्री. शरद ना. वाघवडेकर
    ६. डॉ. श्रीकांत शांताराम वागळे ५,५०१

४. श्रीमती इंदिराबाई व श्री. शंकर सदाशिव वागळे यांच्या स्मरणार्थ
पुत्र श्री. किशोर यांजकडून १०,०००
५. श्री. नागेश गोविंद पालेकर यांच्या पुण्यतिथी निमित्त
पुत्र श्री. प्रकाश यांजकडून २,५०१
६. श्री. विवेक मोहन भेडसगांवकर यांजकडून २,५००
७. श्रीमती सुमित्रा व श्री. मारुती (मता) बोरकर यांच्या स्मरणार्थ
पुत्र श्री. शरद यांजकडून १०,०००

## ☺ ☺ ☺ विजूले चुटकुले ☺ ☺ ☺

कमळी : तॉ आमगेल्या बाजून रावतलॉ नागेश बायलेले कितले कौतुक करता. तिगेल्या वाढदिवसाक तो फुलाचो सडो घालता आणी तिका ताजेर बसयता. ना जाल्यार तुमी ?

घोव : हे पळय तूं ओगीच वाद घालनाका. नागेशालो धंदो फुलाचो आसा. मजो धंदो मिरसांगेचो. हांवे मिरसांग पसरवल्यार तूं थंय बसच्याक तयार आसा ?

नागेशाल्या मोबायलार, तागेल्या बँक खात्यात दीड हजार रुपये जमा जाल्यात असो मेसेज येता. तॉ बायलेकडेन चौकशी करता मगेल्या खात्यात हे पैशे कशे जमा जाले कळना. बायल म्हणता हांवेच ते घाल्यात मे–एप्रिल महिन्याच्या लॉकडावनाचो पगार. नागेश गौजी घालता, तूं कामवालीक तीन हजार दिताली मागीर माका दीडच हजार ? बायल वदरता, कामवालेक पगारच दिताले जेवूक खावूक न्हय. तुका दोन वेळचे जेवण आणि नाश्ता ताजे पैशे हांवे कापून घेतला.

कमळी घोवाक : तुमी खूप भोळे. तुमका कोणीही फसवू शकता.
घोव : हंय, बरोबर. तुजबरोबर लग्न केले नंतर तेन्नाच माकाबी ध्यानात आयले.

– विजय सदानंद वागळे,ठाणे–९३२६६७३७०९



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
Trusted over a Century

Multiple Rewardz in One Fixed Deposit



w.e.f. 19.04.2021

| | From 1 - 2 yrs | Above 2 - 5 yrs | Above 5 - 10 yrs |
|---|---|---|---|
| General Public | 5.60% p.a. | 5.75% p.a. | 5.85% p.a. |
| Senior Citizen | 5.85% p.a. | 6.00% p.a. | 6.35% p.a. |

- Higher Interest for Longer Period
- Choice of Monthly (Discounted) / Quarterly / Maturity Interest Payout
- Higher Yield over Card Rate on Interest Reinvestment Plan
- Instant Liquidity in case of urgency
- Convenient booking through our Quick Mobil App / Net Banking
- Avail Exciting Offers on FD / RD creation via Quick Mobil App
- Auto-Sweep facility available in multiples of INR 1000

T&C Apply.

Rates are applicable for Fixed Deposits in India only.

www.nkgsb-bank.com
Call us: 022 28602000

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.